# वाटवे करंडक २०१४

स्वरानंद प्रतिष्ठान व वाटवे कुटुंबीयांनी आयोजिलेल्या "काव्यगायक गजानन वाटवे करंडक २०१४ स्पर्धेत पुण्याच्या अरुणा अनगळ व चिंचवडच्या नूपुरा निफाडकर यांना द्वितीय पारितोषिक मिळाले.

पुण्याच्या सुचेता जोशी अभ्यंकर यांना सर्वोत्कृष्ट गायिकेचा पुरस्कार मिळाला. सर्वोत्कृष्ट संगीतकाराचा पुरस्कार अरविंद काडगावकर यांच्या संघाला देण्यात आला.

स्पर्धेमध्ये अनुराधा कुबेर, निखिल मोडगी, भाग्यश्री गोडबोले, आशुतोष सोहनी, भूपाळी सिधये व अरुण इंगळे यांच्या संघांनी भाग घेतला होता.

गायक रवींद्र साठे, सुवर्णा माटेगावकर, संगीतकार सलील कुलकर्णी, कवी संदीप खरे हे या स्पर्धेचे परीक्षक होते. पुरस्कार वितरण सोहळ्यावेळी ज्येष्ठ गायक अरुण दाते व संजीव अभ्यंकर उपस्थित होते.